नि. दि. दावा क्र.१८/२०११

नि. क्र.

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की-

**माझे नाव :** **संदीप बळवंत आवळे,**
**वय :** ३२ वर्ष **व्यवसाय** : तलाठी,
**निवासस्थान : लोणारा, ता. कळमेश्वर,जिल्हा : नागपूर**

**<u>वादीतर्फे सरतपासणी वकील श्री जयस्वाल.</u>**

१. मला कोर्टामध्ये साक्ष देण्यास येण्याकरीता कोर्टाचा समन्स मिळाला होता. या समन्स आधारे मला जे जे कागदपत्र आणायची होती. ती मी आज रोजी आणली आहे. मी सर्व्हे क्र. १८९ मौजा गुमथळा मधील पटवारी हलका मधील मिळकतीचा रेकॉर्ड मी आज आणला आहे. मी जो ७/२ उतारा आणला आहे त्यामध्ये प्रकाश नत्थुजी पांडे हे सर्व्हे क्र. १८९ च्या मिळकतीचे मालक म्हणुन दिसत आहे. तसेच ब्रॅकेटमध्ये भाउराव नत्थुजी पांडे, मधुकर नत्थुजी पांडे, रमेश नत्थुजी पांडे, कमल शेषराव हाते यांची नावे आहेत. हे ब्रॅकेटमधील सर्व लोक हे प्रकाश नत्थुजी पांडे यांचे भावंड असुन या भावंडांमध्ये कोर्टाच्या आदेशान्वये वाटण्या झाल्या असुन त्या आदेशाची प्रत मी आज आणली आहे. माननिय तहसीलदार कळमेश्वर यांनी माननीय जिल्हा न्यायाधिश १ यांच्या आदेशान्वये या भावंडांमध्ये त्यांच्या जमीनीच्या वाटण्या झाल्या असुन सर्व्हे क्र. १८९ ही मिळकत प्रकाश नत्थुजी पांडे यांच्या वाटणीस गेली आहे. मी या मिळकतीचा नकाशा देखील आज आणला आहे. तसेच मी या नकाशाची सत्यप्रत न्यायालयात आणली आहे.

कोर्ट प्रश्नः- सर्व्हे क्र १८९ चे क्षेत्र सांगा.

उत्तरः- या जमीनीची क्षेत्र ०.७२ हेक्टर आर ईतके आहे.

प्रश्नः- या जमीनीची चतुसिमा सांगा.

उत्तरः- उत्तरेकडे गावठाण, दक्षीणेकडे सर्व्हे नं. १८७, पुर्वेकडे १८८ व

पश्चिमेकडे सर्व्हे क्र १९० व १९१ असे आहेत.

प्रश्न: सर्व्हे क्र. १८७,१८८,१९० व १९१ चे क्षेत्रफळ सांगा.

उत्तर:-सर्व्हे क्र. १८७ चे क्षेत्रफळ २.४३ हे. आर. सर्व्हे क्र. १८८ चे क्षेत्रफळ १. १५ हे आर, सर्व्हे क्र. १९० चे क्षेत्रफळ ०.३७ असुन सर्व्हे. क्र. १९१ चे क्षेत्रफळ ०.२५ हे. आर आहे.

प्रश्न: सर्व्हे क्र. १८७,१८८,१९० व १९१ हे कोणाच्या नावे आहेत?

उत्तर:-सर्व्हे १८८ पंकज पांडे यांच्या नावे व ईतर यांच्या नावे असुन सर्व्हे नं. १८७ चे भाउराव पांडे व ईतर १९० चे मोरेश्वर पांडे ईतर व १९१ पुरुषोत्तम पांडे व ईतर यांच्या नावे आहेत.

सर्व्हे क्र. १८९ चा पुर्वीचा क्र. हा अभिलेखा आधारे सर्व्हे क्र.१२३ व १२७ दिसत आहे.

कोर्ट प्रश्न:- सव्हे क्र. १८९ हा कोणत्या सव्हे नंबर च्या वेळेस एकत्रीकरण करण्यात आला व त्या सर्व्हे नंबर्सचे क्षेत्रफळ काय होते?

उत्तर:-सर्व्हे क्र. १२३ व सर्व्हे क्र १२७ हा एकत्रिकरणाच्या वेळीस सव्हे क्र. १२३/१ व सर्व्हे क्र १२३/२ तसेच सर्व्हे क्र. १२७/१ व सर्व्हे क्र. १२७/२ असा होता व हे चारही पोट हीस्से एकत्र करुन सव्हे क्र. १८९ करण्यात आला. त्यावेळेस सर्व्हे. क्र. १२३/१ हा ०.२९ हे. आर व सर्व्हे क्र. १२३/२ हा ०.९८ हे. आर ईतका होता. तसेच सर्व्हे क्र. १२७/२ हा ०.२१ हे. आर होता व सर्व्हे क्र. १२७/१ याचे क्षेत्रफळ माझ्याकडे सध्या उपलब्ध नाही.

२. सर्व्हे क्र. १८९ हा माझ्याकडील अभिलेखाअन्वये गयाबाई पांडे यांच्या नावे दिसत आहे. सर्व्हे क्र. १८९ व सर्व्हे क्र. १८८ या जमीनींच्या मध्ये एक धुरा आहे व तसे आमच्या अभिलेखांमध्ये नमुद आहे. साक्षीदार स्वत:हुन असे सांगतो की सध्याच्या घडीला काय परिस्थिती आहे हे मी सांगु शकत नाही. सर्व्हे क्र. १८९ या चतुसिमेमध्ये गावठान सर्व्हे क्र. १८७, सर्व्हे, क्र. १८८, सर्व्हे क्र १९०,१९१ वगळता कोठेही प्रभाकर हनमंत पांडे याचे शेत नाही. पण यांचे शेत ईतर ठिकाणी आहेत. मी आणलेल्य अभिलेख अन्वये जुना सव्हे क्र १३३/१ व

१३२/२ या पोटहीश्श्यांना एकत्र करुन सर्व्हे क्र. १८७ एकत्रिकरणाच्या वेळी तयार करण्यात आला असल्याचे माझ्या मते आढळुन येते कारण सर्व्हे क्र. १३३/ व १३१/२ चे क्षेत्रफळ हे २.४४ हे. आर असुन नविन सर्व्हे क्र. १८७ चे क्षेत्रफळ आजच्या घडीला २.४३ हे. आर ईतके आहे. एक गुंठयाची जी काही तफावत आहे ती भुमी अभिलेख कार्यालयाच्या एकत्रिकरण कार्यक्रमा वेळीस झाली असेल. सर्व्हे क्र.१८९ च्या चतुसिमेला ज्या जमीनी आहे त्या जमीनींपैकी कोणतिही जमीन प्रभाकर हनमंत पांडे यांच्या नावे माझ्या अभिलेखानुसार नाही.

**<u>उलटतपास दि २६.१०.२०१८ रोजीपर्यंत तहकुब करण्यात येतो.</u>**

सा.ब.वा.दा.क.केले.
माझे समक्ष,

दि.न्या.क.स्तर,कळमेश्वर.
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,कळमेश्वर.

**दिनांक : १९.१०.२०१८.**